स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

मानव्य विज्ञान विद्याशाखे अंतर्गत राज्यशास्त्र विषयाच्या अंतर्गत विद्यावाचस्पती (पी.एच.डी.) पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा संशोधन आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

शीर्षक

"शेतकरी चळवळीतील दि.बा. पाटील यांचे योगदानः एक अभ्यास"

संशोधक

धनंजय कृष्णा म्हात्रे

एम ए सेंट (राज्यशास्त्र)

मार्गदर्शक

डॉ. वृशाली एल. फुके

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

श्री शिवाजी महाविद्यालय परभणी

"शेतकरी चळवळीतील दि. बा. पाटील यांचे योगदान : एक अभ्यास"

भारत हा कृषिप्रधान देश आहे. शेती आणि शेतकरी कुठल्याही देशाचा महत्वाचा घटक असतो. भारतामध्ये शेतकऱ्याला 'बळीराजा' म्हटले जाते. भारतातील जवळजवळ निम्म्यापेक्षा जास्त लोकसंख्या शेतीवर आणि शेतीपूरक व्यवसायांवर अवलंबून आहे. म्हणून शेतकरी चळवळींचा अभ्यास विकासाच्या प्रक्रियेत खूपच महत्त्वाचा आहे.

भारतातील स्वातंत्र्यपूर्व काळ आणि स्वातंत्र्योत्तर काळात अनेक शेतकरी चळवळी घडून आल्या. प्रत्येक काळातील शेतकरी चळवळीचे स्वरूप आणि कारणे वेगवेगळी होती. स्वातंत्र्यपूर्व काळातील म्हणजे १९व्या शतकातील चळवळी ब्रिटिश सरकारच्या विरोधी असंतोषाच्या होत्या तर २०व्या शतकातील चळवळी राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यावर प्रभाव टाकणाऱ्या होत्या तर स्वातंत्र्योत्तर काळातील शेतकरी चळवळी हया आपल्याच सरकारच्या विरोधी होत्या. स्वातंत्र्यानंतर भारतात अनेक धरणे बांधली गेली त्यासाठी लाखो हेक्टर जंगले आणि सुपीक जमीन बुडाली. महाराष्ट्रातील शेतकरी चळवळी या स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातही वेगळ्या वैशिष्ट्यांसह समोर आल्या आहेत. काही चळवळीमध्ये ब्रिटिशकालीन शेतीवरील जुल्मी कर भरणे कठीण असल्यामुळे आंदोलने झाली. काही चळवळी सावकार आणि खोत यांच्या शेतकऱ्यांवर होणाऱ्या जुलूम त्यांचे शोषण आणि लूट या विरोधात झाल्या आहेत. तर काही चळवळी हया शेतमालाला वाजवी बाजारभाव मिळावा यासाठी झाल्या आहेत. काही चळवळी हया सरकारी प्रकल्पांसाठी संपादित शेती जमीन किंवा इतर जमिनीच्या न्याय्य मोबदल्यासाठी झाल्या आहेत तर काही शेतकऱ्याचे योग्य व न्याय्य पुनर्वसन यासाठी झाल्या आहेत.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये आपण स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतरची शेतकरी आंदोलने, राष्ट्रीय पातळीवरील शेतकरी आंदोलने, महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलने तसेच रायगड जिल्ह्यातील शेतकरी आंदोलने यांचा अभ्यास करणार आहोत. आणि शेतकरी चळवळीमधील दि.बा. पाटील यांचे योगदान याविषयी अभ्यास करणार आहोत.

महाराष्ट्र राज्यातील कोकण विभागातील रायगड जिल्हा याचे पूर्वीचे नाव कुलाबा असे होते, छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजधानीचे ठिकाण असलेला रायगड किल्ला याच जिल्ह्यात आहे. या किल्ल्याच्या नावावरुन या जिल्ह्याला रायगड हे नाव देण्यात आले. रायगड जिल्ह्यात एकूण १४ तालुके आहेत त्यापैकी उरण तालुक्यातील जासई या गावी १३ जानेवारी १९२६ रोजी दि. बा. पाटील यांचा जन्मा झाला.

महाराष्ट्र विधानसभेचे २ वेळा विरोधी पक्षनेते असलेले दि.बा. पाटील यांचे पूर्ण नाव दिनकर बाळू पाटील होय दि.बा. पाटील यांची राजकीय कारकीर्द तशी मोठीच आहे. १ वेळा पनवेल नगरपरिषदेचे नगराध्यक्ष, ५ वेळा पनवेल-उरण विधानसभेचे आमदार, १ वेळा विधान परिषदेचे आमदार, २ वेळा रायगड (त्या वेळचा कुलाबा) जिल्ह्याचे खासदार आणि २ वेळा विधानसभेचे विरोधी पक्ष नेते अशी त्यांची भरीव कारकीर्द होती.

दि. बा. पाटील हे शेतकरी कामगार पक्षाचे नेते होते. १९५७ साली शेतकरी कामगार पक्षाचे मध्यवर्ती चिटणीस म्हणून देखील त्याने काम पाहिले आहे. १९५७ ते १९६२. १९६२ ते १९६७. १९६७ ते १९७२, १९७२ ते १९७७, १९८० ते १९८४ असे ५ वेळा ते पनवेल-उरण विधानसभेचे आमदार म्हणून निवडून आले होते.

१९७२ ते १९७७ विधानसभेचे विरोधी पक्ष नेते पुन्हा १९८२ ते १९८३ विधानसभेचे विरोधी पक्ष नेते होते. १९७७ ते १९८० आणि १९८४ ते १९८९ दोन वेळा कुलाबा (आताचे रायगड) जिल्ह्याचे खासदार महणून निवडून आले होते. १९९२ ते १९९८ विधान परिषदेचे आमदार होते.

दि. बा. पाटील यांचे वडील बाळू गौरु पाटील हे पेशाने शिक्षक होते. त्यामुळे दिबांना शिक्षणात घरातूनच प्रोत्साहन मिळत गेले. १९४४ मध्ये दि.बा. पाटील मॅट्रिक झाले. पुढे फर्ग्युसन महाविद्यालय पुणे येथे बी.ए. परीक्षा उत्तीर्ण झाले. आणि १९५१ ला एल.एल.बी. झाले

दि. बा. पाटील फक्त राजकीय नेतेच नव्हते तर ते खऱ्या अर्थाने शेतकरी, कष्टकरी जनतेचे नेते होते. १९७० च्या दशकात मुंबईवरचा लोकसंख्येचा भार कमी व्हावा म्हणून महाराष्ट्र सरकारने मुंबई जवळ दुसरे शहर वसवण्याचे ठरविले. त्यासाठी ठाणे आणि आणि रायगड या दोन जिल्ह्यातील बेलापूर आणि उरण-पनवेल या भागातील १५ गावातील जवळपास ५० हजार एकर जमीन कवडीमोल भावाने भूसंपादित करण्यासाठी सिडकोची स्थापना झाली.

फक्त १५००० रुपये एकरी भाव सरकारने ठरविला परंतु याला शेतकरी आणि प्रकल्पग्रस्तांचे नेते दि. बा. पाटील यांनी जोरदार विरोध केला. सरकार आणि शेतकऱ्यांमध्ये १९८४ साली प्रचंड संघर्ष झाला आणि आंदोलन पुकारण्यात आले त्या आंदोलनाचे नेतृत्व अर्थातच शेतक-यांचे नेते दि.बा. पाटील यांनी केले. सरकारविरुद्धच्या संघर्षात पोलिसी गोळीबारात ५ शेतकरी हुतात्मे झाले व शेकडो शेतकरी गोळीबारात जखमी झाले. दि. बा. पाटील सुद्धा या वेळी पोलीसी लाठी हल्ल्यामध्ये गंभीर जखमी झाले होते. दि. बा. पाटीलांनी रस्त्यावरच्या लढाईत तसेच विधानसभेमध्ये सरकारला धारेवर धरले होते.

शेवटी १० मार्च १९८४ रोजी सरकारने एकरी ३०,०००/- रुपये तसेच घेतलेल्या जमिनीच्या १२.५ टक्के विकसीत जमीन शेतकऱ्यांना परत करायची. तसेच भूमीहिन आणि बारा बलुतेदार यांना सुद्धा ४० चौरस मीटरचा विकसीत भूखंड सरकारकडून त्यांचा व्यवसाय बुडणार म्हणून देण्याचे मान्य केले. तसेच येथे येणाऱ्या उद्योगांमध्ये प्रकल्पग्रस्तांना व त्यांच्या वारसांना नोकरीची हमी देण्यात आली. अशा प्रकारे १९७० पासून सुरु असलेले शेतक-यांच्या आंदोलनाची सांगता झाली शेतकऱ्यांचे नेते दि. बा. पाटील यांनी हा लढा यशस्वी केला.

१९८४ च्या शेतकरी आंदोलना व्यतिरिक्त दि. बा. पाटील यांनी १९५८ साली बेळगाव सीमा प्रश्नावरील आंदोलनात सहभाग घेतला. त्यासाठी त्यांना १ वर्षाची शिक्षा झाली होती व त्यांनी ती पूर्ण केली, संयुक्त महाराष्ट्र आंदोलनामध्ये सुद्धा दि.बा. पाटलांचा सहभाग होता मंडळ आयोगासाठी सुद्धा दि. बा. पाटील आणि विधानसभा व विधान परिषदेचे कामकाज रोखले होते.

शैक्षणिक क्षेत्रात सुद्धा दि. बा. पाटील यांनी मोलाचे कार्य केले आहे. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून १९७० मध्ये पनवेल मध्ये आर्ट्स, सायन्स आणि कॉमर्स कॉलेज सुरु केले. पनवेल-उरण तसेच नवी मुंबई, ठाणे येथे अनेक कॉलेजेस आणि हायस्कूल सुरु करण्यामध्ये दि.बा. पाटील यांचे योगदान मोठे आहे. दि. बा. पाटील यांनी धार्मिक अंधश्रद्धांना कधीच पाठिंबा दिला नाही. उलटपक्षी कर्मकांड, अंधश्रद्धा इत्यादीपासून समाजाने दूर राहिले पाहिजे अशी त्यांची विचारसरणी होती. दि. बा. पाटील यांचे निधन २४ जून २०१३ रोजी पनवेल येथे झाले.

संशोधन समस्या :- कोकणातील रायगड जिल्ह्यातील आणि महाराष्ट्रातात अनेक शेतकरी

आंदोलने स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळात झाली. रायगड जिल्ह्यातील इतर मागास अशा आगरी समाजात जन्माला आलेल्या दि.बा. पाटील यांनी नगराध्यक्ष, आमदार, खासदार, विधानसभेचे विरोधी पक्ष नेते म्हणून अनेक राजकीय पदे भूषवले शेतकरी कष्टकरी प्रकल्पग्रस्त यांच्यासाठी अनेक महत्वपूर्ण राजकीय व सामाजिक कार्य केले. शेतकरी आंदोलनातील त्यांचा सहभाग उल्लेखनीय आहे. त्याची सर्वांना माहिती व्हावी तसेच नवीन पिढीला शेतकरी आंदोलनातील सहभागाची माहिती व्हावी या उद्देशाने हा संशोधन विषय निवडला आहे.

आज कालचे राजकारणी लोक हे आपला राजकीय स्वार्थ साधण्यात मग्न आहेत. पण तत्कालीन नेते कसे होते त्यांचा आचार-विचार, सार्वजनिक जीवनातील, प्रमाणिकपणा, क्षमता यांचा अभ्यास होण्यासाठी 'शेतकरी चळवळीतील दि. बा. पाटील यांचे योगदान एक अभ्यास' हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

विषय निवडीचे महत्त्व :- महाराष्ट्रातील शेतकरी व उत्तर कोकणातील शेतकरी, प्रकल्पग्रस्त यांच्या विकासात दि.बा. पाटील यांचे योगदान खूप मोलाचे आहे. त्यामुळे त्यांच्या शेतकरी चळवळीतील योगदानाचा अभ्यास होणे गरजेचे आहे. दि. बा. पाटील यांचे कार्य लोकांसमोर आणण्यासाठी हा विषय महत्त्वपूर्ण स्वरुपाचा आहे.

दि.बा. पाटील यांच्या शेतकरी चळवळीमुळे एक महत्त्वाचे तत्व प्रस्थापित झाले होते की, सरकारने शेतकऱ्यांच्या जमिनी जरी संपादित केल्या तरीही शेतकऱ्याला पूर्णपणे भूमीहिन करता येणार नाही. एकदा प्रकल्पांसाठी जमिनीचे भूसंपादन झाले की, शेतकऱ्यांकडे जमीन राहत नाही परिणामी त्याला त्याच्याच भागातून दुसरीकडे स्थलांतरीत व्हावे लागते. म्हणून संपादित जमिनीपैकी काही जमीनीच्या भाग हा विकसीत करुन शेतकऱ्याला द्यावा जेणे करुन त्या भागात त्या शेतकऱ्याचे अस्तित्व राहील म्हणून आजच्या पिढीला दि.बा. पाटील यांच कार्य माहीत होण्यासाठी हा विषय खूप महत्त्वाचा असल्यामुळे हा विषय निवडण्यात आला आहे.

संशोधन पूर्व साहित्याचा आढावा :- प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यापूर्वी शेतकरी चळवळीशी

संबंधित तसेच महाराष्ट्रातील चळवळीशी संबंधित विषयावर झालेल्या संशोधनाचा अभ्यास करण्यात आला आहे तो पुढील प्रमाणे :-

पराग गोविंद पाटील यांचे "विकासाचे राजकारण व प्रकल्प बाधित शेतकऱ्यांच्या आंदोलने रायगड जिल्हा एक अभ्यास" या राज्यशास्त्र विभागाच्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठाला सादर केलेल्या संशोधने प्रबंधामध्ये शेतकरी आंदोलनाच्या संदर्भात संशोधन झाले आहे.

"Social and Political works of Dinkar Balu Patil (1926 to 2013): A Historical Study" हा प्रबंध इतिहास विषयासाठी श्री. तुकाराम दत्तू माळवे यांनी मुंबई विद्यापीठात २०१८ साली सादर केला. यामध्ये दि.बा. पाटील यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याचा आढावा हा ऐतिहासिक अंगाने घेतला आहे. आपल्या संशोधनात त्यांच्या शेतकरी चळवळीतील योगदान राजकीय अगाने अभ्यासले जाणार आहे.

"Peasent Movement of Maharashtra: A case tudy of the Shetakari Sanghatana". हा अरुणा पेंडसे यांचा फेब्रुवारी १९९१ साली पुणे विद्यापीठात राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन विभागासाठी सादर केलेल्या प्रबंधात शरदराव यांच्या शेतकरी संघटनेचा

अभ्यास करण्यात आला आहे. 'शेतकरी चळवळीतील दि. बा. पाटलांचे योगदानः एक अभ्यास' या संशोधनात शेतकरी चळवळी आणि दि. बा. पाटील यांचे शेतकरी चळवळीतील योगदान अभ्यासणार आहोत.

संशोधनाची उदिष्टे :

१) दि. बा. पाटील यांच्या जीवन कार्याचा अभ्यास करणे.

२) दि. बा. पाटील यांच्या राजकीय प्रवासाचा अभ्यास करणे.

३) महाराष्ट्रातील प्रकल्पग्रस्त शेतक-यांच्या समस्या सोडवण्यासाठी दि. बा. पाटील यांनी केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

४) दि. बा. पाटील यांच्या शेतकरी आंदोलनातील योगदानाचे विश्लेषण करणे.

५) महाराष्ट्रातील शेतकरी चळवळींचा अभ्यास करणे.

६) दि. बा. पाटील यांचे राजकीय नेतृत्व घडविणा-या घटकांचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके :-

१) दि. बा. पाटील हे शेतकरी व कष्टकरी यांच्या समस्या व प्रश्न सोडवण्यासाठी सतत सक्रिय राहिले.

२) दि. बा. पाटील यांचे योगदान महाराष्ट्रातील शेतकरी चळवळींना दिशादर्शक ठरले.

३) दि. बा. पाटील यांनी शेतकरी चळवळी संदर्भात घेतलेल्या निर्णयांचा महाराष्ट्र शासनाच्या धोरणावर सकारात्मक परिणाम झाला.

४) दि. बा. पाटील यांच्या योगदानामुळे रायगड जिल्ह्यातील विकासावर दूरगामी परिणाम झाला.

५) शेतक-यांचे हित हे दि. बा. पाटील यांच्या संघर्षाचा पाया आहे

संशोधन पध्दतीः

"शेतकरी चळवळीतील दि. बा. पाटील यांचे योगदानः एक अभ्यास"

या शोध प्रबंधाचा अभ्यासाठी समाजशास्त्रीय संशोधन पध्दती तसेच ऐतिहासिक विश्लेषणात्मक, वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. तसेच प्रकल्पग्रस्त शेतक-यांच्या मुलाखती व्दारे माहिती घेण्यात येणार आहे.

संशोधनाचे स्त्रोतः

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांच्या वापर करण्यात येणार आहे.

१) प्राथमिक स्वोतः प्राथमिक स्त्रोतामधून तथ्य संकलन करण्यासाठी निरीक्षण, मुलाखती, प्रश्नावली ही साधने वापरली जाणार आहेत.

२) दुय्यम स्त्रोतः दुय्यम स्त्रोतामधून तथ्य संकलन करण्यासाठी सरकारी प्रकाशने पुर्वीचे शोध प्रबंध व्यक्तीगत नोंदी विविध मासिके गौरव ग्रंथे इतर महत्वाची शसकीय दस्तावेज इत्यादीचा उपयोग करण्यात येणार आहेत.

संशोधन व्याप्ती व मर्यादाः

प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र इसवी सन १९५७ ते २०१३ हे असेल या काळातच ते आमदार खासदार विरोधी पक्ष नेता या पदावर होते आणि २०१३ त्यांच्या निधनापर्यंतचा काळ त्यामुळे निवडण्यात आलेला आहे. संशोधनासाठी अभ्यासाचे क्षेत्र निश्चित करून त्यावर सखोल व व्यापक अभ्यास करण्यात येणार आहे. "शेतकरी चळवळीतील दि. बा. पाटील यांचे योगदानः एक अभ्यास" यांचे अध्ययन करताना संशोधकाला काही मर्यादा आहे. शेतकरी चळवळीतील योगदान दिलेल्या सर्वच नेतृत्वाचा इथे अभ्यास करणे शक्य नाही. दि. बा. पाटील यांच्या वरील लिखीत स्वरूपाची माहिती मर्यादित आहे. तथ्य संकलनासाठी वापरल्या जाणा-या मुलाखतीलाही काही मर्यादा आहेत त्याचा परिणाम संशोधनावर होण्याची शक्यता आहे. दि. बा. पाटील यांच्या विषयी शासनाकडे ही मर्यादित—

माहिती असू शकते परंतु संशोधन करताना त्याचा कमीत कमी परिणाम होईल अशा प्रकारे संशोधन करताना काळजी घेवुन हे संशोधन पूर्ण केले जाणार आहे. तसेच या संशोधनात महाराष्ट्रातील तसेच रायगड जिल्हयातील झालेल्या शेतकरी चळवळींचा सुध्दा अभ्यास आपण करणार आहोत.

संशोधन आराखडाः

प्रकरण पहिले :-- **प्रस्तावना**

प्रस्तुत प्रकरणात प्रस्तावना समस्या सूत्रण, विषय निवडीचे महत्व, संशोधनाचे उदिष्टे, संशोधन पध्दती, संशोधनाचा कालखंड, संशोधन आराखडा, संशोधन साहित्याचा, आढावा इत्यादी विषयी विवेचन करण्यात.

प्रकरण दुसरे :– भारतातील शेतकरी चळवळी

प्रस्तुत प्रकरणात भारतातील स्वातंत्रपुर्व आणि स्वातंत्रोत्तर कालखंडातील शेतकरी चळवळींचा अभ्यास करण्यात येणार आहे. ब्रिटीश काळातील शेतकरी चळवळी आणि स्वातंत्रानंतरच्या काळातील देशभरातील चळवळींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे :– महाराष्ट्रातील शेतकरी चळवळी

या प्रकरणात महाराष्ट्र राज्यात झालेल्या स्वातंत्रपुर्व आणि स्वातंत्रोत्तर कालखंडातील शेतकरी चळवळींचा अभ्यास करण्यात येणार आहे. ब्रिटीश काळातील शेतकरी चळवळी आणि स्वातंत्रानंतरच्या काळातील महाराष्ट्रातील तसेच रायगड जिल्हयातील अनेक शेतकरी चळवळींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे :-- **दि. बा. पाटील यांच्या नेतृत्वाचा विकास आणि सामाजिक व राजकीय कार्य**

प्रस्तुत प्रकरणात दि. बा. पाटील यांचे बालपण त्यांचे शिक्षण कौटुंबिक वातावरण, समकालीन वातावरण, त्यांची राजकीय कारकीर्द कशी घडत गेली, त्यांचे नेतृत्व बांधणी यावर सविस्तर विवेचन करण्यात येणार आहे. तसेच त्यांनी केलेले सामाजिक आणि राजकीय कार्याचा आढावा या प्रकरणात घेणार आहोत.

प्रकरण पाचवे :-दि. बा. पाटील यांच्या नेतृत्वाखालील १९८४ सालच्या उत्तर रायगड मधील शेतकरी आंदोलनाचा अभ्यास

प्रस्तुत प्रकरणात दि. बा. यांनी उत्तर रायगडच्या शेतकरी प्रकल्पग्रस्तांसाठी केलेल्या १९८४ च्या उरण शेतक-यां आआंदोलनाचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे :-

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाअंती जे काही निष्कर्ष निघतील ते काढून संबधित गृहीत कृत्याची पडताळणी केली जाणार आहे व त्यानुसार निष्कर्ष काढण्यात येणार आहे.

संदर्भ सूची :-

१) घरत किशोर हरिश्चंद्र, "कष्टकर्याचा असामान्य योध्दा", प्रकाशना न्हावा शेवा बंदर कामगार संघटना (अंतर्गत) उरण, रायगड. २०१४.

२) चौधरी कि.का., "महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, १९९३.

३) व्होरा राजेंद्र, "मुळशी सत्याग्रह", प्रतिमा प्रकाशन, पुणे. १९९४.

४) धर्माधिकारी चंद्रकांत, "खोती विरूध्दचा लढा, रोहा, रायगड. १९९९.

५) पाटील प्रभाकर "कथा एका संघर्षाची" नागेश प्रकाशन, अलिबाग. १९९४.

६) घरत किशोर हरिश्चंद्र, "उरणच्या शेतक-यांच्या ऐतिहासिक संग्राम" एन.एस. बी.के.एस. प्रकाशन, उरण २००२.

७) पाटील वसंत, "चिरनेर जंगल सत्याग्रह १९३०" मयुरी प्रकाशन, चिरनेर. १९९८.

८) पाटील विजय, "एसईझेड". १९९८.

९) मोकल गोपिनाथ, "आगरी समाज शोध आणि बोध", नवी मुंबई. १९६६

१०) जाधव बळीराम, "जगातील एकमेव शेतकऱ्यांचा प्रदीर्घ संप", सुविधा प्रकाशन, पुणे. १९६६.

११) पोतदार माधव, "महाराष्ट्रातील लढे आणि लढवय्ये", पुणे. १९६६.

१२ म्हात्रे व्यंकटेश, "उरणचे राजे वीर वाजेकर", मथुरा प्रकाशन. १९९९.

१३) पाटील अनंत, "गाथा आगरी संस्कृतीची", जाणीव प्रकाशन, नवी मुंबई. २००७.

१४) डॉ. जाधव बबन भिमसेन, "रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळ, शेतकऱ्यांच्या सहभाग", प्रकाशन लक्ष्मी बुक पब्लिकेशन, सोलापूर. २०१४.

१५) दैनिक रामप्रहर, १६ मे २०२१.

१६) बी.बी.सी. मराठी. २४ जानेवारी २०२३.

१७) दैनिक महाराष्ट्र टाईम्स. २४ जानेवारी २०२१.

१८) इंटरनेट.

संशोधक

धनंजय कृष्णा म्हात्रे

एम.ए. सेट. राज्यशास्त्र

परभणी

मार्गदर्शक

डॉ. वृषाली एल. फुके

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

श्री शिवाजी महाविद्यालय